# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४१३/२०२३ दिनांक – ०२/१२/२०२३

## विक्री करीता अंमली पदार्थ कब्जात बाळगणा-या आरोपींना अटक करुन ८.७५० किलो ग्रॅम वजनाचा "चरस" जप्त करण्यात गुन्हे शाखा, कक्ष -३, विरार यांना यश

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरामध्ये अंमली पदार्थ विक्री आणि तस्करी करणा-या समाज कंटकांवर कारवाई करुन त्यांना पायबंद करण्याबाबत मा. वरिष्ठांकडुन गुन्हे शाखेला सुचना देण्यात आल्या होत्या.

दिनांक ०१/१२/२०२३ रोजी रात्रौ दरम्यान कक्ष-३, गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार पेट्रोलींग करत असताना मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दिमध्ये खराडतारा ब्रीजच्या खाली असलेल्या सर्व्हिस रोडवर कैलास जनार्दन तामोरे, वय ३६ वर्षे, रा. ता. डहाणु, जि. पालघर याला विक्री करीता स्वतःच्या कब्जामध्ये बाळगलेल्या १.१ किलो ग्रॅम वजानाच्या ११,००,०००/- रुपये किमतीच्या चरस या अमली पदार्थासह ताब्यामध्ये घेण्यात आले. त्या अनुषंगाने मांडवी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक २७७/२०२३, एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २० (क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

वरील गुन्ह्याच्या तपासादरम्यान अधिक माहिती वरुन आरोपी कैलास जनार्दन तामोरे याचे साथीदार संकेत विजय तामोरे, वय ३२ वर्षे आणि निकेश रमेश दवणे, वय ३७ वर्षे, दोघेही राहणार चिंचणी, ता. डहाणु, जि. पालघर यांना ताब्यामध्ये घेऊन त्यांच्या घरझडतीमध्ये एकुण ७.६५० किलो ग्रॅम वजनाचा चरस हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला.

उपरोक्त तीनही आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून एकुण ८.७५० किलो ग्रॅम वजनाचा ८६,१३,३५०/- रुपये किमतीचा चरस हा अंमली पदार्थ जप्त करण्यात जप्त करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्याचा पुढील तपास कक्ष-३, गुन्हे शाखा, विरार मार्फत करण्यात येत असून, अटक आरोपी यांना दिनांक ०७/१२/२०२३ पर्यंत मा. न्यायालयाने पोलीस कोठडी मंजुर केली आहे. सदरचा अंमली पदार्थ आरोपी यांनी कोठून आणला याबाबत अधिक तपास सुरु आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक / प्रमोद बडाख, पोउपनिरी/ अभिजित टेलर, उमेश भागवत, पोहवा/ अशोक पाटील, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब/ प्रविण वानखेडे गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

**----0000----**